नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे | Year - 2nd | अंक - १७० | Issue - 170 | वार गुरुवार दि. ७ नोव्हेंबर २०२४ | Blow- Thursday Date 7 November 2024 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## महाविकास आघाडीने प्रचाराचा नारळ फोडला

### राज्यातील महिलांसाठी राहुल गांधींची घोषणा; महिना ३ हजार रुपये आणि बस प्रवास मोफत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : भाजपा आणि संघाकडून संविधान कमकुवत केलं जातं आहे. छुपेपणाने हे धोरण राबवलं जातं आहे. आज देशभरात विद्यापीठांमध्ये जे कुलगुरु आहेत त्यांची यादी काढा. त्यात तुम्हाला संघाचेच सदस्य दिसतील. भुगोल, इतिहास, विज्ञान माहीत नसेल तरीही काही फरक पडत नाही. संघाचे आहात तर तुम्हाला कुलगुरु केलं जातं असं राहुल गांधी म्हणाले. इंडिया आघाडीची पहिली प्रचारसभा मुंबईत पार पडली. त्यावेळी राहुल गांधींनी भाजपावर टीका करत महालक्ष्मी योजनेची घोषणाही निवडणुकीच्या अनुषंगाने केली आहे.

निवडणूक आयोग, इडी, सीबीआय, प्राप्तीकर विभाग यांचा वापर करुन सरकार पाडतं. महाविकास आघाडीचं सरकार हे इंडिया आघाडीचं सरकार होतं. ते सरकार पाडण्यात आलं. पैसे देऊन लोक विकत घेतले गेले आणि सरकार पाडलं. कारण काही व्यावसायिकांची मदत भाजपाला करायची होती. मुंबईतली धारावीची जमीन ही एक लाख कोटींची आहे. ही गरीबांची जमीन आहे. ही जमीन गरीबांकडून हिसकावली जाते आहे. सगळ्या जगाला हे सत्य आता समजलं आहे. जगासमोर ही जमीन अदाणींना दिली जाते आहे. जे प्रकल्प होते मग ती अॅपलची फॅक्टरी असो, बोईंगचं युनिट असो इथे येणारे व्यवसाय दुसऱ्या राज्यांमध्ये पाठवण्यात आले असाही आरोप राहुल गांधींनी आपल्या भाषणात केला.




राहुल गांधी म्हणाले इथे युवकांना रोजगार मिळाला असता, पण एकामागोमाग एक प्रकल्प हिसकावले जात आहेत. १ लाख कोटींची जमीन हिसकावण्यात येते आहे. हे आहे भाजपाचं सरकार. तुम्हाला सांगितलं जातं तुम्हाला पैसे देऊ. भाजपा सरकार काय करतंय याचा अभ्यास आम्ही केला. पेट्रोल, गॅस यांच्या किंमती वाढल्या आहेत. प्रत्येक कुटुंबाकडून दरवर्षी ९० हजार रुपये काढून अदाणी-अंबानींना दिले जातात. नंतर सांगितलं जातं की महिलांना १५०० रुपये देणार. मात्र यांची नियत चांगली नाही. हे सगळे अदाणी आणि अंबानींची मदत करणारे लोक आहेत असाही आरोप राहुल गांधींनी केला.

नोटबंदी, जीएसटी यामुळे तुम्हाला फायदा झाला का? तुम्हाला महागाई, बेकारी हे सगळं हवं आहे का? देशात सर्वात जास्त बेरोजगारी आज आहे. महाराष्ट्रच नाही कुठल्याही राज्यात बेकारीचा प्रश्न सर्वात मोठा आहे. मोदी, भाजपाची धोरणं यामुळे बेकारी वाढली आहे. त्यामुळे रोजगार मिळूच शकत नाही अशी स्थिती निर्माण केली गेली आहे. लघू आणि मध्यम व्यावसायिकांना एक एक करुन संपवण्यात आलं. अदाणी-अंबानी रोजगार देऊ शकत नाहीत. रोजगार लघू आणि मध्यम व्यावसायिक, कारखानदार हेच रोजगार देऊ शकले असते. मात्र यांना संपवण्याचं काम भाजपाने केलं. नोटबंदी, जीएसटी ही धोरणं नाही तर ही हत्यारं आहेत. तुम्ही जीएसटी भरता, जेवढा जीएसटी भारतातला गरीब नागरिक देतो तेवढाच जीएसटी अदाणी अंबानी भरतात. हे जीएसटीचं वास्तव आहे. गरीब लोक करभरणा अत्यंत इमानदारीने करतात. हा अप्रत्यक्ष कर असतो त्यामुळे लक्षात येत नाही. प्रत्येक ठिकाणी हा अप्रत्यक्ष कर लागू होतो. ही असली भाजपाची धोरणं आहेत असाही आरोप राहुल गांधींनी केला. एका बाजूला अरबपतींचं राज्य, दुसरीकडे युवक, गरीब, व्यावसिक यांचं सरकार. त्यामुळे महाराष्ट्राच्या जनतेला पाच गॅरंटी दिल्या आहेत. यातली पहिली गॅरंटी मी आज तुम्हला सांगतो आहे. असं राहुल गांधी म्हणाले.

महालक्ष्मी योजनेच्या अंतर्गत ३ हजार रुपये दरमहा आम्ही देणार आहोत. प्रत्येक महिन्याला महिलांच्या खात्यात ही रक्कम दिली जाईल. तीन हजार रुपये खटाखट खटाखट दिले जातील. महाराष्ट्रतील महिला महाराष्ट्रात बसमध्ये गेल्या तर त्यांना बस प्रवास मोफत केला जाईल. तुम्ही विचाराल का? कारण तुम्हाला महागाईने या सरकारने त्रस्त करुन टाकलं, तसंच गॅस सिलिंडर वाढ, महागाई यामुळे महाराष्ट्रातल्या महिलांसाठी आम्ही ही पहिली गॅरंटी जाहीर करत आहोत असं राहुल गांधींनी सांगितलं. इतर गॅरंटी तुम्हाला शरद पवार, उद्धव ठाकरे आणि मल्लिकार्जुन खरगे सांगतील असंही राहुल गांधी म्हणाले.

## 'भारत जोडो'तून अराजक पसरवण्याचे काम


**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कोल्हापूर : राहुल गांधी 'भारत जोडो यात्रा बहुसंख्य कडव्या डाव्या विचारांच्या संघटना, व्यक्ती सहभागी आहेत. ही मंडळी आणि त्यांच्यामार्फत राहुल गांधी हे देशात अराजक पसरवत असल्याचा आरोप

### देवेंद्र फडणवीस यांची राहुल गांधींवर टीका

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी येथे माध्यमांशी बोलताना केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधान म्हटले, की वास्तविक निळ्या रंगाचे स्मरण होत असताना राहुल गांधी हातात लाल रंगाचे संविधानाचे पुस्तक घेऊन फिरत आहेत. या साऱ्यातून त्यांना काय सुचवायचे आहे ते स्पष्ट होत असल्याचा आरोपही फडणवीस यांनी या वेळी केला.

महायुतीच्या प्रचाराचा प्रारंभ करण्यासाठी फडणवीस येथे आले आहेत. आज ते माध्यमांशी बोलत होते. महाविकास आघाडीच्या प्रचाराचा विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या हस्ते प्रारंभ होत आहे. तसेच त्यांच्या उपस्थितीत संविधान सन्मान संमेलन रंगले जात असताना फडणवीस यांनी त्यांच्यावर टीकास्त्र सोडले.



फडणवीस म्हणाले, की 'भारत जोडो समूहा'मध्ये अनेक संघटना कडव्या डाव्या विचारांच्या आहेत. त्यांच्या कामाची पद्धत, ध्येय धोरणे ही अराजक पसरवणारी यंत्रणा आहे. नागरी नक्षलवादाचा हा प्रयत्न आहे. नागरी नक्षलवाद म्हणजे लोकांची मने कलुषित करण्याचा प्रकार. त्यांच्यामध्ये अराजकतेचे एक रोपण करायचे, जेणेकरून देशातील संस्था, यंत्रणा यावरून त्यांचा विश्वास उडेल.

भारत जोडो आंदोलन, संसदेचे अधिवेशन अशा ठिकाणी विरोधी पक्षनेते राहुल गांधी हातात लाल रंगाचे संविधानाचे पुस्तक घेऊन फिरत आहेत. यावरून फडणवीस यांनी विधानसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी महाराष्ट्रात येत असलेले गांधी यांना टीकेचे लक्ष्य केले.

संविधानाचा सन्मानच केला पाहिजे. मात्र डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या संविधानाचा संदर्भ देताना ते कायम निळ्या ऐवजी लाल रंगातील संविधानच दाखवतात. लाल पुस्तक दाखवून कोणाला इशारा देत आहेत? तुम्ही अराजक पसरवत आहात, असा आरोप फडणवीस यांनी केला.

## शारीरिक व्यंगावरून शरद पवारांवर टीका केल्यास खपवून घेणार नाही : अजित पवार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : विधानसभा निवडणुक जवळ येत असल्याने आता प्रचारांचा धडाका पाहायला मिळत आहे. सत्ताधारी आणि पक्षातील नेते एकमेकांवर आरोप प्रत्यारोप करत आहेत. अशातच बुधवारी महायुतीमधील घटक पक्षाचे नेते सदाभाऊ खोत यांनी शरद पवार यांच्यावर टीका करताना वादग्रस्त विधान केले आहे. शरद पवार यांच्या शारीरिक व्यंगावरून सदाभाऊ खोतांनी पवारांवर निशाणा साधला परंतु आता खोत ट्रोल झालेले पाहायला मिळत आहे. राष्ट्रावादीचे नेते आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या वक्तव्यावर हे खपवून घेणार नसल्याचं म्हणत निषेध व्यक्त केलाय.

ज्येष्ठ नेते आदरणीय पवार साहेब यांच्या विषयी सदाभाऊ खोत यांनी केलेले वक्तव्य हे अत्यंत चुकीचे आणि निंदनीय आहे. अशा पद्धतीने खालच्या पातळीवर पवार साहेबांवर वैयक्तिक टीका करणे आम्हास पूर्णपणे अमान्य आहे. ही आपल्या महाराष्ट्राची संस्कृती नाही. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने आणि वैयक्तिकरित्या मी या विधानाचा तीव्र शब्दात निषेध करतो. यापुढे पवार साहेबांवर खालच्या पातळीवर जाऊन



कोणी वैयक्तिक टीका केल्यास राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष खपवून घेणार नाही, असं अजित पवार यांनी म्हटलं आहे.

शरद पवार, उद्धव ठाकरे किंवा काँग्रेसवाले असतील. देवेंद्र फडणवीसांना का घेरायला लागलेत माहितीय का? गायीची कास आहे त्याला चार थानं असतात. यामधील अर्थ वासराला पाजायचं आणि साडेतीन थानातील दूध आपणच हाणायचं पण फडणवीस म्हणत होते की गायीचं सगळं दूध वासराचं आहे. मी सगळं दूख वासरांनाच देणार मग पवार साहेबांना नऊवा महिना लागल्या आणि कळा सुटल्या. ते म्हणाले माझ्या चिल्यापिल्यांचं कसं व्हायचं? पवारसाहेब तुमच्या चिल्यापिल्यांनी कारखाने हाणले, सुतगिरण्या हाणल्या पण पवारसाहेबांना मानावं लागेल. ते म्हणताय की, मला महाराष्ट्राचा चेहरा बदलायचाय, तुम्हाला काय तुमच्या चेहऱ्यासारखा महाराष्ट्र पाहिजे का? असं वादगस्त विधान सदाभाऊ खोत यांनी केलं.

## 'रातोरात बुलडोझर कारवाई नकोच'; सर्वोच्च न्यायालयाने उत्तर प्रदेश सरकारला फटकारले



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : 'बुलडोझर आणावा आणि रातोरात इमारती पाडाव्यात, असे तुम्ही करू शकत नाही', अशा शब्दांत सर्वोच्च न्यायालयाने उत्तर प्रदेश सरकारवर ताशेरे ओढले. २०१९ मध्ये अतिक्रमण हटवितेवेळी सरकारतर्फे करण्यात आलेली कारवाई 'बेकायदेशीर' असल्याचा उल्लेख करीत रस्ते रुंदीकरण आणि अतिक्रमण हटविण्याच्या प्रक्रियेवरून सर्व राज्य तसेच केंद्र शासित प्रदेशांनाही निर्देश जारी केले. दरम्यान, उत्तर प्रदेशच्या मुख्य सचिवांना महाराजगंज जिल्ह्यातील एका घराशी संबंधित प्रकरणाची चौकशी करून योग्य ती कारवाई करण्याचे निर्देशही खंडपीठाने दिले.

सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड आणि न्या. जे.बी. पारडीवाला व न्या. मनोज मिश्रा यांच्या खंडपीठाने उत्तर प्रदेश सरकारच्या कारवाईवर तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त केली. तसेच रस्ता रुंदीकरणादरम्यान ज्या व्यक्तीचे घर पाडण्यात आले होते त्यास २५ लाखांची नुकसानभरपाई देण्याचे आदेशही सर्वोच्च न्यायालयाने दिले.

अतिक्रमण काढण्यासाठी अतिक्रमणकर्त्याला नोटीस जारी करणे आवश्यक आहे.

नोटीसची सत्यता आणि वैधतेवर आक्षेप घेतल्यास नैसर्गिक न्यायाच्या सिद्धांतानुसार कारणासह आदेश जारी करण्यात यावे. आक्षेप फेटाळल्यास तर्कसंगत नोटीस बजावण्यात यावी.

संबंधित व्यक्ती आदेशाचे पालन करण्यास नकार देत असेल तर सक्षम प्राधिकरणाने अतिक्रमण हटविण्यासाठी पावले उचलावीत.

अतिक्रमण शोधण्यासाठी अभिलेख, नकाशांच्या आधारे रस्ते रुंदीकरणाचा शोध घ्यावा व सर्वेक्षण करावे.

रस्त्याची सध्याची रुंदी, रस्ता रुंदीकरणासाठी पुरेशी नसेल तर उपक्रम हाती घेण्यापूर्वी कायद्यानुसार संबंधित जमीन संपादित करण्यासाठी पावले उचलावी.

### सर्व राज्य, केंद्र शासित प्रदेशांना रस्ता रुंदीकरणासंदर्भात निर्देश

रस्ता रुंदीकरण प्रकल्पाबाबत राज्याच्या वकिलांनी युक्तिवाद करताच रुंदीकरण केवळ निमित्त होते, संपूर्ण कारवाईमागे वास्तविक कारण आहे असे वाटत नाही, अशी टिप्पणी खंडपीठाने केली. ढोलकीच्या थापावर तुम्ही कोणालाही घर रिकामे करण्यास सांगू शकत नाही, अशा शब्दांत ताशेरेही ओढले. दरम्यान, मुख्य सचिवांना जारी केलेल्या आदेशांत कारवाईशी संबंधित कंत्राटदार व अधिकाऱ्यांच्याही चौकशीचा समावेश आहे.

तुम्ही अशा प्रकारे लोकांची घरे कशी काय उद्ध्वस्त करू शकता? ही संपूर्णत: अराजकता नाही का? कोणतीही नोटीस देत नाही आणि तुम्ही थेट येता आणि घर उद्ध्वस्त करता. तुम्ही कुटुंबाला घर रिकामे करण्याचा वेळही देत नाही. घरातील घरगुती वस्तूंचे काय?, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हंटले आहे.

## मनसे उमेदवारांच्या प्रचारार्थ मंगळवेढ्यात सभा

### राज ठाकरे यांची स्पष्टोक्ती

## माझ्या हातात सत्ता देऊन बघा कसा विकास होत नाही

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी

पंढरपूर मंगळवेढा विधानसभेचे नवनिर्माण सेनेचे अधिकृत उमेदवार यांच्या प्रचारार्थ मंगळवेढा आले असता राज ठाकरे यांनी मंगळवेढा हा दुष्काळग्रस्त कायम राहिला आहे त्याचे कारण त्यांनी सांगितले. त्यांनी प्रचार सभेत बोलताना पंढरपूर मंगळवेढा विधानसभा दुष्काळग्रस्त तालुका म्हणून कसा आहे याविषयी विधानसभा जिंकण्यासाठी आपले घर भरणे असे काम येतील विधानसभेचे आमदार यांनी केलेले आहे त्यामुळे येणाऱ्या निवडणुकीला महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे उमेदवार दिलीप बापू धोत्रे यांना आपले यांची खून रेल्वे इंजिन आहे रेल्वे इंजिन इंजिनच्या समोरची बटन




दाबून त्यांना निवडून द्यावे असे राज ठाकरे यांनी सर्व मतदारांना सांगितले सांगितले आहे. विधानसभा जिंकण्यासाठी विदाई काम कुठलेही करायचे नाही आपले स्वतःचे सुधारणा कशा पद्धतीने करता येईल अशा प्रकारची येथील आमदारांनी केले आहे

येथील लोक पुणे मुंबई येथे काम व्यवसाय करण्यासाठी जात आहे त्यांना या भागांमध्ये व्यवसाय करण्यासाठी व स्वतःची काम करण्यासाठी आपण त्यांना मंगळवेमध्येच हाताला काम देऊ अशा प्रकारची त्यांनी मतदारांना संबोधित केले आहे. येथील युवा बेरोजगारांना काम करण्यासाठी मुंबई पुणे येथे जावे लागत असे येथील काम हे विधायक काम करण्यासाठी त्यांना मंगळवेढा मध्येच काम त्यांना युवा युवा युतींना काम देण्यासाठी आपण महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने मोठे उद्योगधंदे उभा करून त्या भागातील युवक युवतींना त्यांना काम देण्यासाठी नवनिर्माण सेना त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहील असे मत नवनिर्माण सेनेचे राज ठाकरे यांनी केले आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पंढरपूर मंगळवेढा विधानसभेची अधिकृत उमदवार दिलीप धोत्रे यांना प्रचंड मतांनी विजयी करा असे त्यांनी मंगळवेढा ते जनतेला केलेली आहे.

## अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदी पुन्हा डोनाल्ड ट्रम्प

नवी दिल्ली : जागतिक महासत्ता अमेरिकेच्या चाव्या नेमक्या कुणाच्या हाती जाणार, याची गेल्या महिन्याभरात जोरदार चर्चा पाहायला मिळाली. अमेरिकेतील राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीचे पडसाद जगभरात उमटणं साहजिक असून त्यानुसार अवघ्या जगाचं या निवडणुकीकडे लक्ष लागलं होतं. भारतीय प्रमाणवेळेनुसार मंगळवारी संध्याकाळी अमेरिकेत मतदानाला सुरुवात झाली. बुधवारी पहाटे मतमोजणीला सुरुवात होऊन दुपारी १ च्या सुमारास निकाल स्पष्ट झाले. रिपब्लिकन पक्षाला अमेरिकेत बहुमत मिळालं आहे. त्यामुळे डोनाल्ड ट्रम्प पुन्हा एकदा अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदी विराजमान होणार असल्याचं आता स्पष्ट झालं आहे. डोनाल्ड ट्रम्प यांच्या रिपब्लिकन पक्षाला अमेरिकेच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत बहुमत मिळालं आहे. ओहियोमध्ये डेमोक्रॅटिक पक्षाचे सदस्य शेरॉड ब्राऊन यांचा रिपब्लिकन पक्षाचे उमेदवार बर्नी मोरेनो यांच्याकडून पराभव झाला. त्याआधी वेस्ट व्हर्जिनियाचे रिपब्लिकन पक्षाचे उमेदवार जिम जस्टिस यांनी सहज विजय मिळवल्यानंतर या दोन जागांमुळे डोनाल्ड ट्रम्प यांच्या विजयाचा मार्ग सुकर झाला. विस्कॉन्सिन, पेनसिल्वानिया आणि मिशिगन या ठिकाणी डेमोक्रॅटिक पक्षाकडून कडवी झुंज पाहायला मिळाली. जिम जस्टिस यांच्या विजयामुळे डेमोक्रॅटिक पक्षाकडची वेस्ट व्हर्जिनियाची जागा रिपब्लिकन पक्षाकडे आली. त्याशिवाय टेक्सास आणि फ्लोरिडातील टेड क्रुझ व रिक स्कॉट या रिपब्लिकन पक्षाच्या उमेदवारांना पराभूत करण्याचे डेमोक्रॅट्सचे प्रयत्न धुळीला मिळाले. जागतिक महासत्ता अमेरिकेच्या चाव्या आता डोनाल्ड ट्रम्प यांच्या हातात गेल्या आहेत. डोनाल्ड ट्रम्प यांचे भारताबरोबर जिव्हाळ्याचे संबंध आहेत. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे ते चांगले मित्र आहेत. त्यामुळे डोनाल्ड ट्रम्प यांच्या विजयानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी डोनाल्ड ट्रम्प यांचे अभिनंदन केलं आहे. निवडणुकीतील ऐतिहासिक विजयाबद्दल माझे मित्र डोनाल्ड ट्रम्प यांचे मनापासून अभिनंदन. तुम्ही तुमच्या मागील कार्यकाळात चांगली कामगिरी केलीत. भारत-अमेरिका व्यापक जागतिक आणि धोरणात्मक भागीदारी आणखी मजबूत करण्यासाठी मी उत्सुक आहे. आपल्या लोकांच्या भल्यासाठी आणि जागतिक शांतता, स्थिरता आणि समृद्धीसाठी एकत्रितपणे काम करूया, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले.



### भारताचे संबंध अधिक दृढ करण्याकरता नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला विश्वास

## संपादकीय....

# कारवाईवरून राज्यांना आदेश

'बुलडोझर आणावा आणि रातोरात इमारती पाडाव्यात, असे तुम्ही करू शकत नाही', अशा शब्दांत सर्वोच्च न्यायालयाने उत्तर प्रदेश सरकारवर ताशेरे ओढले. २०१९ मध्ये अतिक्रमण हटवितेवेळी सरकारतर्फे करण्यात आलेली कारवाई 'बेकायदेशीर' असल्याचा उल्लेख करीत रस्ते रुंदीकरण आणि अतिक्रमण हटविण्याच्या प्रक्रियेवरून सर्व राज्य तसेच केंद्र शासित प्रदेशांनाही निर्देश जारी केले. दरम्यान, उत्तर प्रदेशच्या मुख्य सचिवांना महाराजगंज जिल्ह्यातील एका घराशी संबंधित प्रकरणाची चौकशी करून योग्य ती कारवाई करण्याचे निर्देशही खंडपीठाने दिले. सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड आणि न्या. जे.बी. पारडीवाला व न्या. मनोज मिश्रा यांच्या खंडपीठाने उत्तर प्रदेश सरकारच्या कारवाईवर तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त केली. तसेच रस्ता रुंदीकरणादरम्यान ज्या व्यक्तीचे घर पाडण्यात आले होते त्यास २५ लाखांची नुकसानभरपाई देण्याचे आदेशही सर्वोच्च न्यायालयाने दिले. अतिक्रमण काढण्यासाठी अतिक्रमणकर्त्याला नोटीस जारी करणे आवश्यक आहे. नोटीसची सत्यता आणि वैधतेवर आक्षेप घेतल्यास नैसर्गिक न्यायाच्या सिद्धांतानुसार कारणासह आदेश जारी करण्यात यावे. आक्षेप फेटाळल्यास तर्कसंगत नोटीस बजावण्यात यावी. संबंधित व्यक्ती आदेशाचे पालन करण्यास नकार देत असेल तर सक्षम प्राधिकरणाने अतिक्रमण हटविण्यासाठी पावले उचलावीत. अतिक्रमण शोधण्यासाठी अभिलेख, नकाशांच्या आधारे रस्ते रुंदीकरणाचा शोध घ्यावा व सर्वेक्षण करावे. रस्त्याची सध्याची रुंदी, रस्ता रुंदीकरणासाठी पुरेशी नसेल तर उपक्रम हाती घेण्यापूर्वी कायद्यानुसार संबंधित जमीन संपादित करण्यासाठी पावले उचलावी. रस्ता रुंदीकरण प्रकल्पाबाबत राज्याच्या वकिलांनी युक्तिवाद करताच रुंदीकरण केवळ निमित्त होते, संपूर्ण कारवाईमागे वास्तविक कारण आहे असे वाटत नाही, अशी टिप्पणी खंडपीठाने केली. ढोलकीच्या थापावर तुम्ही कोणालाही घर रिकामे करण्यास सांगू शकत नाही, अशा शब्दांत ताशेरेही ओढले. दरम्यान, मुख्य सचिवांना जारी केलेल्या आदेशांत कारवाईशी संबंधित कंत्राटदार व अधिकाऱ्यांच्याही चौकशीचा समावेश आहे. तुम्ही अशा प्रकारे लोकांची घरे कशी काय उद्ध्वस्त करू शकता? ही संपूर्णतः अराजकता नाही का? कोणतीही नोटीस देत नाही आणि तुम्ही थेट येता आणि घर उद्ध्वस्त करता. तुम्ही कुटुंबाला घर रिकामे करण्याचा वेळही देत नाही. घरातील घरगुती वस्तूंचे काय?, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हंटले आहे.

# कर्करोगाचं निदान करा, हयगय नको !!

जागतिक कर्करोग दिन हा ४ फेब्रुवारी रोजी कर्करोगाविषयी जागरुकता निर्माण करण्यासाठी आणि त्याचे प्रतिबंध, शोध आणि उपचारांना प्रोत्साहन देण्यासाठी म्हणून ओळखला जाणारा आंतरराष्ट्रीय दिवस आहे. हा दिवस संयुक्त राष्ट्रसंघाद्वारे पाळला जातो. तसेच जागतिक समुदायाला शिक्षण सुधारण्यासाठी आणि कर्करोगाविरूद्धच्या लढ्यात वैयक्तिक, सामूहिक आणि सरकारी कृती प्रज्वलित करतो. जागतिक कर्करोग दिन २००८ मध्ये लिहिलेल्या जागतिक कर्करोग घोषणेच्या उद्दिष्टांना पाठिंबा देण्यासाठी युनियन फॉर इंटरनॅशनल कॅन्सर कंट्रोलच्या मार्गदर्शनाने साजरा केला जातो. जागतिक कर्करोग दिनाचे प्राथमिक उद्दिष्ट कर्करोगामुळे होणारे आजार आणि मृत्यू लक्षणीयरीत्या कमी करणे हे आहे. तसेच कर्करोगापासून बचाव करता येण्याजोग्या पीडितांवर होणारा अन्याय दूर करण्यासाठी आंतरराष्ट्रीय समुदायाला एकत्र आणण्याची ही एक संकल्पना आहे असे मानले जाते.

जागतिक कर्करोग दिन चुकीच्या माहिती विरोधात जनजागृती करतो, जागरूकता वाढवतो आणि हानी कमी करतो. जागतिक कर्करोग दिनानिमित्त कर्करोगाने बाधित झालेल्यांना पाठिंबा देण्यासाठी विविध उपक्रम राबवले जातात. यापैकीची एक चळवळ म्हणजे छेक्ऱळीडशश्रष-ळश असून, यात लोकांनी स्वतःचे डोके मुंडन करून किंवा तशी आभासी प्रतिमा निर्माण करून ती सोशल मीडियावर प्रगट करण्याची जागतिक चळवळ आहे. याद्वारे कर्करोगावर उपचार घेत असलेल्यांसाठी एक प्रकारे मानसिक पाठिंबा दर्शविण्याची ही एक कृती आहे. अशा प्रकारचे जगभरात शेकडो कार्यक्रम घेतले जातात. जागतिक कर्करोग दिनाची स्थापना ४ फेब्रुवारी २००० रोजी पॅरिस येथे झालेल्या न्यू मिलेनियमसाठी कर्करोग विरुद्धच्या जागतिक कर्करोग शिखर परिषदेत करण्यात आली. जागतिक कर्करोग दिनाचा परिचय हा पॅरिस चार्टरचा एक महत्त्वाचा घटक आहे, जो कर्करोग संशोधन, प्रतिबंध, रूग्णांची काळजी, जागरूकता आणि जगभरात एकत्रीकरणाचाही प्रयत्न करतो. संशोधनाला चालना देण्यासाठी, कर्करोग रोखण्यासाठी, रुग्ण सेवा सुधारण्यासाठी पॅरिस अगेन्स्ट कॅन्सरची सनद तयार करण्यात आली होती. त्यामध्ये जागतिक कर्करोग दिन म्हणून स्थापित करणारा लेख देखील समाविष्ट होता, ज्यावर तत्कालीन युनेस्कोचे संचालक, कोचिरो मत्सुरा आणि तत्कालीन फ्रान्सचे अध्यक्ष जॅक शिराक ४ फेब्रुवारी २००० रोजी पॅरिसमध्ये या समिटमध्ये स्वाक्षरी केली होती.

सोप्या भाषेत सांगायचे तर, कर्करोग हा जगातील प्रमुख मारकांपैकी एक आहे. केवळ या वर्षी, जवळजवळ ९.६ दशलक्ष लोक कर्करोगाने मरतील आणि त्यावर नियंत्रण न ठेवता, २०३० पर्यंत दरवर्षी मृत्यूची संख्या १३.२ दशलक्षपर्यंत वाढेल. प्रतिबंध, शोध आणि उपचार कार्यक्रमांसाठी वाढीव सरकारी मदत आणि निधीमुळे यापैकी बरेच मृत्यू



– प्रवीण बागडे, नागपूर
भ्रमणध्वनी: ९९२३६२०९१९
ई-मेल: pravinbagde
@gmail.com

टाळले जाऊ शकतात. कर्करोगाविषयी जागरुकता वाढवण्यासाठी आणि या आजाराला तोंड देण्यासाठी व्यावहारिक धोरणे विकसित करण्यासाठी तातडीने पावले उचलली नाहीत तर लाखो लोक मरत राहतील. दुर्दैवाने, कॅन्सरमध्ये सर्वात जास्त वाढ कमी आणि मध्यम उत्पन्न असलेल्या देशांमध्ये होण्याचा अंदाज आहे, जे रोगाच्या सामाजिक आणि आर्थिक प्रभावाचा सामना करण्यास सर्वात कमी सज्ज आहेत. या आजाराबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि कर्करोगाचे ओझे कमी करण्यासाठी व्यावहारिक रणनीती विकसित करण्यासाठी तातडीने कृती करण्याची गरज आहे. जागतिक कर्करोग दिन हा शब्द पसरवण्याची आणि आंतरराष्ट्रीय मीडिया आणि जागतिक आरोग्य आणि विकास कार्यक्रमांमध्ये या रोगाबद्दल जागतिक जागरूकता निर्माण करण्याची योग्य संधी आहे.

जागतिक कर्करोग दिन रन फॉर ए क्युअर आफ्रिकाची आठवण करून देतो की कर्करोग ही जागतिक आणीबाणी आहे आणि आपण प्रत्येकजण या आजारावर नियंत्रण ठेवण्यासाठी आपली भूमिका कशी बजावतो. रन फॉर ए क्युअर आफ्रिकाहा वकिलांच्या मोठ्या समुदायाचा एक भाग कसा आहे, याची साक्ष देणे, आमच्या कार्याला असेच देते. खूप अर्थ आणि आम्हाला कृती करण्यास प्रेरित करते. कर्करोग अशी स्थिती आहे ज्यामध्ये शरीरातील काही पेशी अनियंत्रितपणे विकसित होतात आणि शरीराच्या इतर भागांमध्ये पसरतात. जागतिक स्तरावर, कर्करोग हे मृत्यूचे प्रमुख कारण आहे, २०२० मध्ये एक कोटीपेक्षा जास्त मृत्यूचे कारण आहे. भारतात, २०२२ मध्ये अंदाजित १९ ते २० लाख प्रकरणे आढळून आली आहेत. तंबाखूचा वापर, दीर्घकाळ मद्यपान, अस्वस्थ अन्न सवयी, शारीरिक व्यायामाचा अभाव आणि वायू प्रदूषणाच्या संपर्कात येणे हे सर्व कर्करोगाच्या धोक्याचे घटक आहेत. कमी आणि मध्यम उत्पन्न असलेल्या राष्ट्रांना अनेक जुनाट आजारांमुळे होणाऱ्या कर्करोगाच्या जोखमीला तोंड देण्याचे अनोखे आव्हान आहे. या व्यतिरिक्त या राष्ट्रांनी शिक्षणाचा अभाव, विलंब निदान आणि स्वस्त उपचारांसाठी कमी प्रवेश यामुळे कर्करोगाचे खराब निदान दर्शविले होते. विकसनशील देशांमध्येही, कर्करोगाबाबत जागरूकता नसल्यामुळे निदानास विलंब होतो. २०२० मध्ये नोंदवलेला एक अभ्यास, भारतातील चार प्रमुख केंद्रांमध्ये आयोजित करण्यात आला होता, जेथे कर्करोगाचे बहुसंख्य रुग्ण त्यांच्या प्रगत अवस्थेत असतानाच प्रथमच उपचार घेतात. साक्षरता दर आणि कमी उत्पन्नाचा कर्करोग जागरूकतेवर खूप प्रभाव पडतो. भारतात, उच्च उत्पन्न आणि साक्षरता पातळी असलेले लोक इतरांपेक्षा कर्करोगाविषयी अधिक जागरूक होते.

निष्कर्षापर्यंत, भारतीय आणि जागतिक लोकसंख्येमध्ये कर्करोगाची तपासणी, प्रतिबंध आणि उपचारांबद्दल सामान्य जागरूकता कमी आहे, विशेषतः कमी आणि मध्यम उत्पन्न असलेल्या लोकांमध्ये साक्षरतेचे प्रमाण कमी आहे ज्यामुळे कर्करोगाचा प्रादुर्भाव वाढतो आणि ती भरून काढण्याची तातडीची गरज आहे. योग्य शिक्षणासह कमतरता. जागतिक कर्करोग दिन कर्करोग टाळण्यासाठी, तो लवकर शोधणे आणि उपचार करणे किती महत्त्वाचे आहे याकडे लक्ष वेधतो. कर्करोगाचे अनेक प्रकार टाळता येत नसले तरी, काही लोक निरोगी जीवनशैली जगत असले तरीही त्यांना कर्करोगाचे निदान केले जाईल. कर्करोगाचा धोका अनेक मार्गांनी कमी केला जाऊ शकतो. यासह फळे आणि भाज्या जास्त आणि प्रक्रिया केलेले पदार्थ आणि लाल मांस कमी असलेले पौष्टिक आहार घेणे, नियमित व्यायाम आणि निरोगी वजन राखणे, तंबाखूजन्य पदार्थांच्या वापरापासून दूर राहणे

### किमान अल्कोहोल सेवन

अतिनील किरणांपासून सावधगिरी बाळगण्यामध्ये सनस्क्रीन वापरणे आणि संरक्षणात्मक कपडे घालणे समाविष्ट आहे. तसेच शिफारस केलेल्या कर्करोगाच्या तपासणीमध्ये नियमितपणे सहभागी होणे, पर्यावरणातील हानिकारक रसायनांचा संपर्क टाळणे, ह्युमन पॅपिलोमाव्हायरस विरुद्ध लसीकरण ज्यामुळे कर्करोग होऊ शकतो.

या वर्षी जागतिक कर्करोग दिनाची थीम आहे केअर गॅप बंद करा, जी २०२२ थीमची निरंतरता आहे आणि प्रत्येक वर्षासाठी निर्दिष्ट उद्दिष्टांसह ३ वर्षांची मोहीम चालेल. बहु-वर्षीय मोहिमेमध्ये अधिक एक्सपोजर आणि प्रतिबद्धता, तसेच जागतिक जागरूकता वाढवण्याच्या आणि प्रभाव पाडण्याच्या अधिक संधी मिळतील अशी अपेक्षा होती. एकत्रितपणे आम्ही सत्तेत असलेल्यांना आव्हान देतो. अंतिम वर्ष कर्करोगाच्या प्राधान्याबाबत उच्च अधिकाऱ्यांचे लक्ष वेधून घेणे, असमानतेचा सामना करण्यासाठी सर्जनशील धोरणे विकसित करणे आणि न्याय्य आणि कर्करोगमुक्त जग निर्माण करण्यासाठी संसाधनांचे वाटप करण्यावर भर देतो.

# आदिवासी बोलीतील विलक्षीत प्रेमकथा
# मीमेटू बगा मंतीरु सुग्री वल्द मंगरु



आदिवासी भागात प्रेमानूळ्ली गाव समवेत 'बायो-बाबो' वाहून गेल्याने, मनानी खचलेला तरुण रुबाबदार मंगरु जंगलातच वास करु लागला. जंगलाजवळच दहा-बारा झुग्गीची (झोपडी) गोंडीटोला वस्ती वास्तवास राहते. एके दिवशी या वस्तीच्या चुडला पोरी (लहान मुली) व तरुण मुली आंघोळीसाठी तलावाच्या दिशेने निघाल्या, डोंगरातून तलावात पडणा-या खूपच सुंदर फेसांडलेला पाण्याचा नजराणा सुग्रीला बेधुंद करून आंघोळीसाठी मोहीत झाली, आकर्षित केल्याने सुग्रीसह सर्वच पोरी पाण्यात शिरल्या व आनंदोत्सवाने हसत खेळत रमल्या होत्या.

पण काळोखाचा ओघ, ढग काळवटलेले पाहून सर्व चूडला पोरी वस्तीकडे निघाल्या, तशी सुग्री लक्ष करत लगबगीने पाण्याबाहेर निघून चमचमणारे कातडे व पानांनी कसेबसे अंग झाकून वाटेने निघत असतांना पावसाचा भलताच वर्षाव झाला, भिजलेली सुग्री जंगलात झाडाच्या आधाराने थांबून आपले थरथरणारे शरीर न्याहाळत होती, पाऊस थांबेना, सुग्री घाबरून गेली....

पोटाची भूक, मनाला शांती, शरीराला विसावा मिळावा अन् पावसापासून बचाव करण्यासाठी तरुण वयाचा दुःखी, कष्टाळलेला मंगरु जंगलातून रानमेवा व फळे, फळभाजी आपल्या झुग्गीकडे पावसामुळे धावत-पळत निघत होता, तो सुध्दा मोठा विशाल वृक्षापासून बचाव करण्यासाठी त्याच पिंपळाच्या झाडाखाली थांबला, तेथेच मागच्या बाजूला थरथर कापत, हळहळ करत तरुण सुंदर सूडोल गोरी वर्णाची पोर सुग्री बसून होती, काही क्षणात मंगरु व सुग्रीची नजरानजर झाली, बोलण्याचा प्रयत्न, पण शब्द उमटत नव्हते.

तरी हिंमतीने मंगरु म्हणाला 'निम्मे के' (तुम्ही कोण)

'सुग्री मनता' ती उच्चारली,

मंगरु- 'मीमेंटू बगा मंतरु'

'महे नार' म्हणून सुग्री स्वतःबद्दल सांगत



होती, तो मात्र तिला पाहून धूंद झाला होता.

तसीच सुग्री म्हणाली 'मेमेंट ही पही'

मंगरु म्हणतो 'इके हूर्'..... बोलता-बोलता एकमेकांना पसंत करु लागले.



तेव्हा तो म्हणतो निवांत जीवाने माता (त्याने प्रेमाचा प्रस्ताव ठेवला)

ती एकदम हसून फूलली व प्रेमाचे बंध जूळून आले.

प्रेम बहरुन काही काळ लोटून गेला ते एकमेकांच्या अधून होवून भविष्याचा वेध घेण्यासाठी आधार हवा होता दोघांना. याच विचाराने...

मंगरु म्हणतो- 'नीम्मे नावातोंडे पेडंलू'

ती ' मंताने' (ती होकार देते) एकमेकांशी संवाद साधून, विचार करून काही दिवसांनी सुग्रीच्या गोंडीटोला येथे जाऊन दोघांनी जमलेल्या लोकांना आपल्या प्रेम प्रकरणाची विलक्षीत कथा सांगून मनातील ओझे कमी केले.

त्या गोंडीटोल्याची परंपरा जगावेगळी-चजगावेगळीच, संध्याकाळ होताच जनावराचे कातडे लावलेले व पाने गुंडाळलेली आदिवासी समाजातील लोक भाले, दांडपट्टे व काठ्या घेवून गोटूल जवळ एकत्र शेकोटी पेटवून जमा झाले.

हुर्.... हुर्.... ले असा मोठा आवाज त्याठिकाणी दुमदुमला व लागलीच गोंडी देवपूजेला सुरुवात झाली, देवीला साक्षी ठेवत मंगरु व सुग्री यांचा लग्न लावायचे ठरवत परंपरेप्रमाणे लग्न लावल्या गेले.

रे.... ना.... रे.... ना

रेरे .... ना.... रेरे.... ना असा गोंडी विवाह महोत्सव साजरा करतात. तर कधी मधी किल्लं.... किल्लं.... आवाज करत हातातील काठ्या वगेरे जमीनीवर ठोकतात.

तपन तपे..... हिवरी-पिवरी....

हीला बासींग बांधा, करा नवरी....

अशा रितीरिवाजाने व परंपरागत लग्नाच्या बंधनात अडकतात. (सुग्री वल्द मंगरु) सुग्री संग मंगरु यांना तो जंगलातील आदिवासी समाज स्विकारतो, अन् त्यांच्या सुखी जीवनाला सुरुवात होते. यवनाची कळी उमलू लागते.



– मुन्नाभाई नंदागवळी,
येरंडी-बाराभाटी, जि. गोंदिया.
मो. ९७६४६७६४९९
(कथाकार साहित्याचे अभ्यासक आहेत.)

सुखी संसाराचा गाळा चालविण्यासाठी सुग्री व मंगरु अनेक दिवसांनी खोलवर शिरतात. फळे फूले, भाज्या रानमेवा गोळा करण्यासाठी जाताना पाहून त्यांच्या मार्गावर गोंडीटोल्यातील लबाड-धूर्त, नराधमांनी मारण्याचा कट आधीच बांधला होता. त्या संधीचा आज सोने करु या बेताने जंगलातच सुग्री आणि मंगरु यांना घेरले, मंगरुला भाले टोचत व काठ्या मारत देत वार करु लागले, तोच रक्तबंबाळ मंगरु जमिनीवर कोसळला पाहून सुग्री ढसा-ढसा रडून गयावया करु लागली. संधी साधता काही नराधमांनी बळजबरीने निरदोष सुग्रीवर अतिप्रसंग व अत्याचार केला. त्यामुळे दोघांनाही वेदना सहन होत नव्हत्या, डोळ्यातून आसवांचा समुद्र वाहतच सुग्री व मंगरु यांना प्राण सोडला, दोघेही जीवनातून मुक्त झाले, सुग्री नेहमी मंगरुला म्हणायची असे आपण कोठेही गेलो तरी एकमेकांची साथ सोडायची नाही कदाचित नियतीला हेच मान्य असावे....!

## जागृत मारूतीच्या मनमोहक दर्शनाने भक्त सुखावले

## अन्नछत्र मंडळातील महाप्रसाद घेऊन भाविक तृप्त



# दिवाळी पाडव्यानिमित्त दक्षिणमुखीच्या मंदीरात भाविकांची गर्दी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : दिवाळी सणाच्या निमित्ताने गौडगांव येथील रामदास स्वामी, स्थापित दक्षिणमुखी श्री जागृत मारुती मंदिरात भविकांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. मंदिरातील फुलाची विविध रंगाच्या आकर्षक सजावट व मारुतीचे गोजिरे रूप पाहून, मारूतीचे मनमोहक दर्शनाने भक्त सुखावले. मंदीराचे परिसर शेकडो पणत्यांच्या प्रकाशाने झगमगून निघाले होते.यावेळी रामभक्त हनुमान की जय..पवनपुत्र हनुमान की जय..जय जय श्री बजरंगबली अशा घोषणा देत हजारो भक्तांनी मारुती चरणी लीन झाले.

**यावेळेस मारुतीस अभिषेक, रुद्राभिषेक, होमहवन, महाआरती कार्यक्रम पार पडला. सकाळी पहाटे पासुन सुरू झालेली गर्दी रात्री उशिरापर्यंत सुरू होती. राज्य व परराज्यातुन आलेल्या भाविक भक्तांनी मारुतीचे दर्शन शांततेत घेत होते. श्री जागृत मारुती अन्नछत्र मंडळात महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी हजारो भाविक भक्तांनी महाप्रसादाचे लाभ घेतले.**

दिवाळी लक्ष्मीपूजन व पाडव्यानिमित्त श्री जागृत मारुतीच्या दर्शनासाठी भाविक भक्त मोठ्या संख्येने येत असतात या पार्श्वभूमीवर मंदिर परिसराची केलेली सजावट मनमोहक दिसुन आले. या सजावटीमुळे संपूर्ण मंदिराचे रुपडे अधिक आकर्षक दिव्यांनी उजळून निघाले होते. दिवाळी पाडव्याला मारुतीचे दर्शन केल्याने सुख प्राप्त होत असते. अशी भाविकांची जुनी श्रद्धा आहे.त्यामुळे पाडव्यानिमित्त मारुतीच्या दर्शनासाठी सकाळपासूनच भक्तांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. पहाटेपासून सुरू झालेली भाविकांची लगबग रात्री उशिरापर्यंत सुरू होती.

अन्नछत्राची महती राज्य व राज्यात पोहोचलेली आहे. अन्नदान केल्याने पुण्य प्राप्त होत असते. म्हणुन शासकीय, निम शासकीय, राजकीय उद्योजक, समाजसेवा व अन्या लोकांकडून महाप्रसादाच्या रूपातच अन्नदान दिले जाते.

येणारे प्रत्येक भाविक भक्त अन्नछत्र मंडळातील महाप्रसाद घेऊन तृप्त होत असतात.महाप्रसाद घेण्यासाठी सकाळपासून सुरू झालेली गर्दी रात्री ८ वाजेपर्यंत सुरू असते.

यावेळी मंदिर समितीचे अध्यक्ष श्रीकांत खानापुरे, सिद्राम वाघमोडे, प्रकाश मेंथे, चौडप्पा सोलापुरे,बिराप्पा पुजारी, शांतया स्वामी, प्रकाश सनकळ, ज्ञानेश्वर फुलारी, परमेश्वर सुतार, मल्लिनाथ शेरीकर, भारत नन्नवरे, शिवप्पा फुलारि व मंदिराचे सेवेकरी आदीनी परिश्रम घेतले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

दैनिक
यश सिद्धि न्यूज



## थोडक्यात...

### कमलेश नगरात घरफोडी; पावणेतीन लाखांचा ऐवज लंपास

सोलापूर, (प्रतिनिधी) : बार्शी रोडवरील कमलेश नगर येथील घराचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्याने घरातील किचनमध्ये असलेल्या लोखंडी कपाटातील सोन्याचे दागिने व कागदपत्रांची फाईल असा एकूण २ लाख ७७ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेल्याची घटना ४ नोव्हेंबर रोजी घडली.याप्रकरणी सतीश शिवाजी चवरे (वय-३१,रा. कमलेश नगर,बार्शी रोड,एम एस सी बी सब स्टेशनच्या पाठीमागे) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक धायगुडे हे करीत आहेत.

### शेतजमिनी वरून मारहाण; चौघांवर गुन्हा

सोलापूर, (प्रतिनिधी) : शेत जमिनीवरून मारहाण केल्याप्रकरणी चार जणांविरुद्ध फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे ही घटना दोन नोव्हेंबर रोजी दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास शिवाजीनगर बाळे येथील सर्वे नंबर १८/३/ब येथे घडली. याप्रकरणी नितीन औदुंबर ठोकळ (वय-३९,रा. रेल्वे लाईन देशक वाडी यांनी फौजदार चवळी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे त्यांच्या फिर्यादीवरून मिथुन बाळू राठोड त्यांची पत्नी (नाव माहीत नाही), चिथून बाळू राठोड व व त्यांची पत्नी (नाव माहीत नाही) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, फिर्यादी हे शेत जमिनीचे कायदेशीर मालक असताना त्या शेतजमिनीमध्ये फिर्यादी हजर असून देखील वरील संशयित आरोपी तेथे आले व फिर्यादी यांचे शेत जमीन अतिक्रमण केली.त्यानंतर फिर्यादी यांना शिवीगाळ करून काम थांबवून मिथुन राठोड व त्यांची पत्नी तसेच चिथुन राठोड यांनी फिर्यादीस मारहाण करून धक्काबुक्की केली.त्यावेळी फिर्यादी यांना ही जमीन आमची आहे तू येथून निघून जा पुन्हा या जमिनीमध्ये पाय ठेवशील तर आम्ही तुला जिवंत ठेवणार नाही असे म्हणत धमकी दिली व जमिनीमध्ये रोवलेले सिमेंटचे सहा मार्किंग पोल तोडून टाकून एकूण ४ हजार ८०० रुपये इतक्या मालमत्त्याचे नुकसान केले आहे.असे फिर्यादीत नमूद आहे.पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक पाटील हे करीत आहेत.

# जिथून विठ्ठलच्या परिवर्तनाची सुरुवात तिथून विधानसभेची मुहूर्तमेढ

## अभिजीत पाटलांसारखा वाघ त्यांना टक्कर देण्यासाठी तयार : खा.धैर्यशील मोहिते-पाटील

## मी जो काही शब्द देतो तो मी पूर्णच करतो : अभिजीत पाटील

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याच्या परिवर्तनाची जिथून सुरुवात झाली. त्या तुंगत गावामध्ये विधानसभेची देखील मुहूर्तमेढ रोवण्यात आली. माढा विधानसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार अभिजीत पाटील यांची पहिली सभा तुंगत येथे संपन्न झाली. यावेळी महाविकास आघाडीतील प्रमुख पदाधिकारी आणि मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.







यावेळी अनेक वक्त्यांनी बोलताना सांगितले की यंदा आपल्याला परिवर्तन करायचे आहे. आपल्या तालुक्याचा आवाज विधानसभेत घुमवायचा आहे.

आपलं मत हे अभिजीत पाटील यांना नसून तालुक्याच्या विकासाला आहे.

जसं की विठ्ठलच्या निवडणुकीत मतदान रुपी आशीर्वाद दिला तो सार्थ ठरवून दाखवला. तसेच विधानसभेच्या निवडणुकीमध्ये सुद्धा आपण अभिजीत पाटील यांच्या पाठीशी राहून आशीर्वाद देऊ नक्कीच ते आपले प्रश्न विधानसभेमध्ये मांडतील असा विश्वास दिला.

लोकसभेच्या निवडणुकीत करकंब येथील सभेतील जयंत पाटील यांनी अभिजीत पाटील म्हणजे नेताजी पालकर आहे. अशी उपमा त्यांनी बोलताना व्यक्त करून दाखवली होती याला उजाळा दिला.

यावेळी बोलताना अभिजीत पाटील म्हणाले की निवडणूक ही कारखान्याची नसून विधानसभेची आहे. तालुक्यामध्ये प्रश्न बरेच आहेत. त्या प्रश्नावर आपण बोलू ऊस आणि कारखाना हा विधानसभेतील प्रश्न नाही. मी जो काही शब्द देतो तो मी पूर्णच करतो. मला राजकारण करायचं नाही समाजाची सेवा करायची आहे. वंचित शोषित यांना न्याय देण्याचे काम करायचे आहे. या भागाचा विकास करण्यासाठी मतदान रुपी आशीर्वाद देऊन सेवा करण्याची संधी द्यावी अशी भावनिक साद श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीत आबा पाटील यांनी उपस्थित नागरिकांना घातली.



यावेळी माढा लोकसभेचे खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी बोलताना सांगितले की शंकरराव मोहिते-पाटील, स्वर्गीय औदुंबरअण्णा यांनी सहकार हे स्वतःच्या कुटुंबासारखे जपले आणि चालवले काही राजकीय लोकांनी सहकार मोडून काढण्याचा प्रयत्न केला. परंतु अभिजीत पाटलांसारखा वाघ त्यांना टक्कर देण्यासाठी तयार झाला.

सामान्य शेतकरी कुटुंबातील पोरग ह्यांना वरचढ चालायला लागले आहे. हे विरोधक म्हणतायेत आम्ही स्वतःच्या जीवावर मोठे झालोय आम्हाला कोणी सहकार्य केलं नाही तर उमेदवारीसाठी उंबरे का झिजवले लागले

तुमची एवढी ताकद होती तर आत्तापर्यंत स्वतःच्या हिमतीवर का आमदार झाले नाहीत. आमच्याकडील १४ गावातून मोठे मताधिक्य मिळेल. मला इथल्या जनतेकडून सुद्धा तसाच शब्द पाहिजे इकडचा भाग वणवे झाला पाहिजे अशा पद्धतीचे अशी अपेक्षा खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी तुंगत येथील सभेमध्ये वेक्त केली.

याप्रसंगी खासदार धैर्यशील मोहिते-पाटील, विठ्ठल मा.संचालक रामदासबापू रणदिवे, संचालक विठ्ठलनाना रणदिवे, पांडूरंग कदम, बाळासाहेब सालविठ्ठल, डॉ. आबासाहेब रणदिवे, डॉ.योगेश रणदिवे, धनाजी रणदिवे, राजाभाऊ रणदिवे, मारुती रणदिवे, रायाप्पा हळणवर, तुकाराम मस्के, अमित साळुंखे, पंकज लामकाने, ताज मुलांनी, औदुंबर गायकवाड यांसह आदी अनेक मान्यवर व ग्रामस्थ उपस्थित होते.

# कार्तिकी यात्रेनिमित्त श्री विठ्ठल रूक्मिणीमातेचे २४ तास दर्शन सुरू; कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : कार्तिकी यात्रा दरवर्षी प्रबोधिनी शुध्द एकादशी या दिवशी भरते. सन २०२४ यावर्षी कार्तिकी यात्रा दिनांक १२ नोव्हेंबर रोजी आहे. या यात्रेचा कालावधी दि.०२ ते १५ नोव्हेंबर असा राहणार आहे. या यात्रेला भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी असते. दरवर्षी कार्तिकी यात्रेला भाविकांची होणारी गर्दी लक्षात घेता, यात्रा कालावधीत चांगला मुहुर्त व दिवस पाहून श्रींचा पलंग काढून भाविकांना २४ तास दर्शन उपलब्ध करून देण्यात येते.

दिनांक ०४ नोव्हेंबर रोजी चांगला दिवस असल्याने विधिवत पुजा करून सकाळी ७.३० वाजता श्रींचा पलंग काढण्यात आला असून, विठ्ठलाच्या मूर्तीच्या पाठीशी लोड व रुक्मिणी मातेच्या मूर्तीच्या पाठीशी तक्क्या देण्यात आला आहे. त्यामुळे श्री विठ्ठल रुक्मिणीमातेचे २४ तास मुखदर्शन, तर २२.१५ तास पदस्पर्श दर्शन सुरू राहणार असल्याचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी सांगीतले.

यावेळी मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, सदस्य ह.भ.प.ज्ञानेश्वर देशमुख जळगांवकर, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, व्यवस्थापक मनोज श्रोत्री, लेखा अधिकारी मुकेश अनेचा, विभाग प्रमुख संजय कोकीळ उपस्थित होते.

श्रींचा पलंग काढण्यात आल्याने काकडा आरती, पोशाख, धुपारती, शेजारती इ. राजोपचार बंद होवून पहाटे ४.०० ते ५.०० या वेळेत नित्यपुजा, सकाळी १०.४५ ते ११.१५ पर्यंत महानैवेद्य व रात्री ८.३० ते ९.०० या वेळेत लिंबूपाणी / गंधाक्षता हे राजोपचार सुरू ठेवण्यात येत आहेत. दिनांक ०४ ते २० नोव्हेंबर (प्रक्षाळपुजा) पर्यंत २४ तास दर्शन उपलब्ध राहील. कार्तिकी यात्रेला सुरवात झाली असून, भाविकांची दर्शनरांगेत गर्दी वाढत आहे. परंपरेनुसार २४ तास दर्शन सुरू करण्यात आल्याने जास्तीत जास्त भाविकांना श्री विठ्ठल रूक्मिणीमातेचे दर्शन होणार असल्याचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी सांगीतले.

# लाचेची मागणी केल्याप्रकरणी दोघांवर गुन्हा

सोलापूर, (प्रतिनिधी) : लाचेची मागणी केल्याप्रकरणी दोन जणांविरुद्ध फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे याप्रकरणी आकाश सुभाष गायकवाड (वय-३०, रा.मुक्काम पोस्ट काटी,तालुका तुळजापूर) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून सोनाली अभिजीत राजकर व अभिजीत राजकर (रा.विजापूर रोड) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. ही घटना १५ ऑक्टोंबर २०२४ ते ४ नोव्हेंबर २०२४ दरम्यान घडली. याबाबत अधिक माहिती अशी की, फिर्यादी यांच्या कामाचे ठिकाण इको बँक मुरारजी पेठ सोलापूर येथे सोनाली राजकर हिने बँकेत येऊन फिर्यादीस खाते उघडायचे आहेत असे बोलून ओळख करून मोबाईल नंबर घेतला व त्यानंतर व्हाट्सअप वर चॅटिंग करून ओघात फिर्यादी कडून पाठवलेल्या मेसेजचा फायदा घेऊन एक प्रकरण मिटवण्यासाठी सोनाली राजकर व अभिजीत राजकर यांनी फिर्यादी यांना दत्त हॉटेल येथे बोलावले. त्यानंतर दहा लाख रुपयांची मागणी करून तडजोडी अंती दोन लाख रुपयांची मागणी करत करत पैसे दिले नाही. तर तुला जेलची हवा खायला पाठवतो अशी दमदाटी केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक जाधव हे करीत आहे.

# गुन्ह्यांची माहिती प्रसिद्धी करणे उमेदवारांना बंधनकारक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : विधानसभा निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांवर दाखल गुन्ह्यांची माहिती निवडणूक काळात तीनवेळा प्रसिद्ध करणे उमेदवारांना बंधनकारक करण्यात आले आहे. उमेदवारांनी दाखल गुन्ह्याची माहिती प्रसिध्द करावी असे आवाहन २५२-पंढरपूर विधानसभा मतदार संघाचे निवडणूक निर्णय अधिकारी सचिन इथापे यांनी केले आहे.

तसेच त्यांना उमेदवारी देणाऱ्या राजकीय पक्षांनाही त्यांच्या अधिकृत संकेतस्थळावर ही माहिती प्रसिद्ध करावी लागणार आहे.

उमेदवारांवर गुन्हे कोणत्या स्वरूपाचे आहेत व त्यांची सद्य:स्थिती काय हे माहिती असणे हा मतदारांचा अधिकार आहे. त्यामुळे उमेदवारांना, तसेच ते ज्या पक्षाकडून उमेदवारी करणार आहेत त्या पक्षांना संबंधित उमेदवाराच्या गुन्हेगारी पार्श्वभूमीची प्रसिद्धी करावी लागणार आहे. निवडणूक आयोगाने विहित केलेल्या शपथपत्रातील नमुन्यात प्रलंबित गुन्हेगारी खटल्यांची परिपूर्ण माहिती ठळकपणे देणे उमेदवारांवर बंधनकारक करण्यात आले आहे. उमेदवार आणि संबंधित पक्षांनाही प्रलंबित गुन्हेगारी खटल्यांच्या माहितीला वर्तमानपत्र आणि इलेक्ट्रॉनिक मीडियाद्वारे प्रसिद्धी द्यावी लागणार आहे. ही प्रसिद्धी निवडणूक कालावधीत तीन वेळा द्यावयाची आहे.

# भगीरथ भालके यांच्या प्रचाराचा माचणूर येथे नारळ फोडून केला शुभारंभ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदारसंघाचे उमेदवार भगीरथ भालके यांच्या प्रचाराचा शुभारंभ माचनूर येथे नारळ फोडून करण्यात आला.

गेल्या पोट निवडणुकीत तीन हजार मतांनी पराभव झाला मात्र आता तीस हजार मतांनी विजयी होऊ असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. असा निर्धार काँग्रेसचे उमेदवार भगीरथ भालके यांच्या प्रचार सभेत बालके समर्थकांनी व्यक्त केले माचनूर तालुका मंगळवेढा येथे प्रचाराचा शुभारंभ नारळ फोडून करण्यात आला.

गेल्या तीन वर्षात मंगळवेढा तालुक्यात धनगर समाजाला अन्याय यावेळी बोलताना धनगर समाजातील एड्राव येथील कार्यकर्ते काळे यांनी आपली व्यथा मांडताना मंगळवेढा तालुक्यातील गेले तीन वर्षात धनगर समाजावा अन्याय झाला आहे २००९ सालची पुनरावुती यावेळी करूया अशी साद त्यांनी घातली.



यावेळी खा. प्रणिती शिंदे, मा.आ. दिलीप माने. उमेदवार भगीरथ भालके अँड नंदकुमार पवार अँड गणेश पाटील श्रीमती जयश्रीताई भालके तानाजी खरात, समाधान फाटे, पांडुरंग चौगुले, किरण राज घाडगे, पांडुरंग चौगुले यांच्यासह हजारच्या संख्येने मोठ्या प्रमाणात कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## तिसऱ्या दिवशीच्या प्रचार दौऱ्यात आ आवताडे यांचे गावोगावी जंगी स्वागत

प्रचार शिगेला

# विकास क्रांतीच्या मोठ्या पर्वासाठी आणखी एक संधी द्या : आ. समाधान आवताडे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी- पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघात अनेक प्रलंबित विकास कामे पूर्ण झाली आहेत. उर्वरित विकास कामांची पूर्तता होण्यासाठी व विकास क्रांतीचे आणखी मोठे पर्व निर्माण करण्यासाठी आशीर्वाद रूपाने आणखी एक संधी द्या यापेक्षाही जोमाने आपली सेवा करुन दाखवेन असे प्रतिपादन भाजपा-महायुतीचे अधिकृत उमेदवार आमदार समाधान आवताडे यांनी निवडणुकीच्या प्रचारार्थ मंगळवेढा तालुक्यातील प्रचार ग्रामस्थांसमवेत सभा घेतल्या.

सदरप्रसंगी मतदारसंघातील गावांसाठी केलेली विविध विकास कामे गावकऱ्यांना सांगून भाजप-महायुतीला मतदान करावे अशी विनंती केली.

मतदारसंघात रस्ते, वीज, शिक्षण, आरोग्य त्याचबरोबर मंडप बांधकाम, दलित वस्ती येथील संविधान भवन, सभामंडप बांधकाम, स्मशानभूमी संरक्षक भिंत बांधकाम इत्यादी कामे झाली आहेत. शिवाय विविध रस्ते सुधारणा तसेच जलजीवन मिशन अंतर्गत नळ पाणीपुरवठा सोय या कामांना भरघोस निधी मंजूर करुन अनेक विकास कामे मार्गी लावली आहेत. गेल्या ३वर्षात तालुक्यासह गावांचा झालेला विकास आणि महायुती सरकारने घेतलेले लोकहिताचे निर्णय गावकऱ्यांना सांगून भाजप-महायुतीलाच मत द्यावे अशी विनंती उमेदवार समाधान आवताडे यांनी केली.

तसेच श्रीमती रुक्मिणी दोलतडे, सरपंच श्रीमती आरती कांबळे, दिपक भोसले, प्रदीप खांडेकर, शशिकांत चव्हाण, दत्तात्रय जमदाडे, अशोक चौंडे, राजेंद्र सुरवसे, संबंधित गावांचे सरपंच, उपसरपंच, आजी-माजी ग्राम पंचायत सदस्य आणि पदाधिकारी तसेच भाजप-महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# सुपतगांव येथे माजी विद्यार्थी स्नेहमेळावा उत्साहात संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

उमरगा /प्रतिनिधी : उमरगा तालुक्यातील सुपतगाव येथील भिमराव लामजणे प्रशाला येथील २०१०-२०११ सालीच्या दहावीतील बॅचच्या विद्यार्थ्यांनी मंगळवारी दि. ०५ रोजी १४ वर्षांनी स्नेह मेळावा घडवून आणला. हा गेट-टुगेदर सोहळा मोठ्या थाटामाटात संपन्न झाला.

माजी विद्यार्थ्यांनी गुरुजींना पुष्पांची उधळण करत त्यांना फेटा बांधून शाल -श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक बाळू जगदाळे यांनी केले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी त्यांच्या शालेय जीवनातील व सद्यस्थितील अनुभव व्यक्त केले, तसेच गुरुजींनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रशालेचे मुख्याध्यापक शिवशरण कारभारी, या कार्यक्रमास शाळेतील सहशिक्षक श्रीशैल तुप्पे, शेखर सगर, महादेव शिदोरे नागनाथ कांबळे, शाळेतील कर्मचारी उमाकांत बिराजदार, लक्षिमन हुलमुजगे यांची उपस्थिती होती.

तसेच २०१०-११ च्या बॅचमधील धनराज पांढरे, प्रशांत भुजबळ, अमोल लामजणे, हणमंत लामजणे, तनुजा करके, अंबिका बोने यांच्यासह सर्व मुले- मुली, मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन परमेश्वर जगदाळे तर आभार प्रशांत भुजबळ यांनी मांडले.

## थोडक्यात...

### मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी एकावर गुन्हा

सोलापूर, (प्रतिनिधी) : मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी एका जनाविरुद्ध एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना २९ ऑक्टोंबर रोजी दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास घडली.याप्रकरणी महेश आण्णाराव रेऊरे (वय-२६,रा. मु.केगाव,पो. सुलेर,ता.अक्कलकोट) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून विठ्ठल श्रीमंत देसाई (मु.केगाव,पो. सुलेर,ता.अक्कलकोट) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, वरील संशयित आरोपी याने फिर्यादी यांच्या वडिलांच्या नावे असलेली दुचाकी क्रमांक एमएच.१३.सीएच.८६२० ही दुचाकी अविचाराने चालवून होटगी जुने टोलनाक्याजवळ उत्पादन फुटपाथ वरून घालून येतील कमानीला धडकून त्यात फिर्यादी यांचे वडील अण्णाराव बसनिंगप्पा रेऊरे (वय-५२) यांचा गाडीवरून तोल जाऊन खाली रस्त्यावर पडून डोक्यात मार लागून गंभीर जखमी करत मृत्यूस कारणीभूत झाला आहे.असे फिर्यादीत नमूद आहे. पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल शिंदे हे करीत आहेत.

### लॉज मधून रक्कमसह सोन्याचे दागिने लंपास

सोलापूर, (प्रतिनिधी) : लॉज मधील असलेली रोख रक्कम व चार तोळे वजनाच्या सोन्याच्या चार अंगठ्या असा एकूण ७५ हजार ७०० रुपयांचा ऐवज चोरून नेल्याची फिर्याद कुसुम मनोहर मोरे (वय-७०,रा.धरमशी लाईन,मुरारजी पेठ) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे त्यांच्या फिर्यादीवरून शिवाजी रामचंद्र खंडागळे (रा.थोबडे मळा,देगाव नाका) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, फिर्यादी यांचे संतोष लॉज मधील सफाई काम करणारा वरील संशयित आरोपी याने संतोष लॉज मधील राहत्या घरातील फिर्यादी यांचा वरील किमतीचा ऐवज चोरून नेला आहे.असे फिर्यादीत नमूद आहे. हि घटना २० ते ३० ऑक्टोबर दरम्यान संतोष लॉज मुरारजी पेठ येथे घडली. या घटनेचा पुढील तपास पोलीस हवालदार चुंगे हे करीत आहे.

# कार्तिकी वारीसाठी मंदिर समिती सज्ज

## भाविकांना पुरेशा प्रमाणात सोई सुविधा; सुमारे १८०० अधिकारी, स्वयंसेवक - कर्मचाऱ्यांची नियुक्ती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : कार्तिकी एकादशी मंगळवार, दिनांक १२ नोव्हेंबर रोजी आहे. या यात्रेला अंदाजे ८ ते १० लाख वारकरी भाविक येतात. कार्तिकी यात्रा कालावधीत भाविकांना आवश्यक व मुबलक सोयी-सुविधा मंदिर समितीच्या मार्फत उपलब्ध करून देण्यात येत आहेत. त्यामध्ये दर्शनरांगेत बॅरीकेटींग करून त्यावर ताडपत्री शेड, जादा पत्राशेडची निर्मिती, आपत्कालिन गेट, विश्रांती कक्ष, फॅब्रिकेटेड शौचालये, बसण्याची सुविधा, लाईव्ह दर्शन, कुलर-फॅन, मिनरल वॉटर व चहा वाटप करण्यात येणार असल्याची माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.





भाविकांचे लवकरात लवकर दर्शन होण्यासाठी दर्शनरांग जलद व द्रुतगतीने चालविणे कामी आवश्यक त्या उपाय योजना राबविण्याच्या दृष्टीने भाविकांच्या हस्ते होणाऱ्या पूजा बंद ठेवणे, महत्वाच्या व अति महत्त्वाच्या व्यक्तींच्या थेट दर्शनावर निर्बंध, ऑनलाइन दर्शन बुकिंग पास बंद ठेवणे, दर्शन रांगेत भक्तांची संख्या मोजणीचा कॅमेरा, घुसखोरी करणाऱ्या वर गुन्हा दाखल करणे व अनुभवी व प्रशिक्षित कमांडोजची नियुक्ती करण्यात आली आहे. याशिवाय, परंपरेनुसार श्रींचा पलंग काढल्याने दैनंदिन २४ तास मुखदर्शन व २२ तास पदस्पर्शदर्शन उपलब्ध होत आहे.

तसेच या यात्रा कालावधीतील श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिराशी संबंधित असलेल्या प्रथा व परंपरांचे कटाक्षपणे पालन करण्यात येत असून, श्रींचा पलंग काढणे, एकादशीच्या सर्व पुजा, महानैवेद्य, श्रींच्या पादुकांची मिरवणूक, महाद्वार काला व प्रक्षाळपुजेचे योग्य ते नियोजन करण्यात आले आहे.

याशिवाय, आपत्कालिन व सुरक्षा व्यवस्थेकामी, सोलापूर महानगरपालिका यांचेकडील रेस्क्यू व्हॅन प्रशिक्षित कर्मचा-यासह, सिझफायर यंत्रणा, स्कायवॉकवर आपत्कालीन गेट व फोनची व्यवस्था, चंद्रभागा नदीपात्रात आपत्ती व्यवस्थापन पथकाची नियुक्ती, अत्याधुनिक ११८ सीसीटीव्ही कॅमेरे व त्यासाठी कंट्रोल रूम, वायरलेस यंत्रणा, जनरेटर, मेटल डिटेक्टर, सार्वजनिक प्रसारण सुचना प्रणाली, चौकशी कक्ष, बॅग स्कॅनर मशिन, अपघात विमा पॉलीसी, मॅन काउंटिंग मशीन इ. व्यवस्था करण्यात आली आहे.

**दर्शनरांग द्रुतगतीने चालवण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना : कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके**

देणगी घेण्यासाठी जादा २० स्टॉलची निर्मिती व ऑनलाईन देणगीसाठी टठ उजऊए, ठढत्रड्ड ची सुविधा, सोने-चांदी वस्तु दान करण्यासाठी स्वतंत्र कक्ष तसेच नगरप्रदक्षिणा, दर्शनरांग, मंदिर प्रदक्षिणा, चंद्रभागा वाळवंट इ. पंढरपूर नगरपरिषद हद्दीतील ठिकाणची स्वच्छता देखील मंदिर समिती मार्फत करण्यात येत आहेत. या कामी स्वयंसेवी संस्थाची मदत घेण्यात येत आहे.

वैद्यकीय व्यवस्थेच्या दृष्टीने मंदिर परिसरामध्ये दोन अद्ययावत रूग्णवाहिका वैद्यकीय पथकासह, मंदिर समिती मार्फत श्री संत ज्ञानेश्वर दर्शन मंडप येथे प्रथमोपचार केंद्र, वैष्णव चॅरीटेबल व मेडिकल ट्रस्ट, मुंबई यांचेमार्फत मंदिराच्या मळवदावर भाविकांसाठी मोफत वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून येणार आहे. तसेच दर्शनरांगेत शासनाच्या आरोग्य विभागामार्फत दर्शनमंडप व पत्राशेड येथे आयसीयु, बाजीराव पडसाळी, सारडा भवन इत्यादी ठिकाणी आरोग्य व्यवस्था असणार आहे.

महिला भाविकांच्या सोईसाठी सॅनिटरी नॅपकीन, हिरकणी कक्ष व चंद्रभागा वाळवंट येथे चेंजिंग रूम उभारण्यात येत आहेत, चेंजिंग रूम चे ठिकाणी सुरक्षिततेच्या दृष्टीने महिला कमांडोची नियुक्ती करण्यात येत आहे.

**श्रींचा प्रसाद म्हणून बुंदी व राजगिरा लाडूप्रसाद व त्यासाठी पश्चिमद्वार, उत्तरद्वार व्यतिरिक्त श्री संत तुकाराम भवन येथे नवीन स्टॉलची निर्मिती करण्यात आली आहे. तसेच दर्शनरांगेत शाबुदाणा / तांदळाची खिचडी व चहा तसेच मागील वर्षाप्रमाणे ४ दिवस पत्राशेड येथे २४ तास मोफत भोजन व्यवस्था करण्यात येत आहे. या सर्व नियोजनासाठी सुमारे १८०० अधिकारी, कर्मचारी व स्वयंसेवक सेवा पार पाडणार असल्याचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी यावेळी सांगितले.**

# वंचित बहुजन आघाडीचे अधिकृत उमेदवार संतोष पवार यांच्या प्रचार दौऱ्याला गावा-गावातून मिळतोय प्रतिसाद



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : २५१-सोलापूर दक्षिण विधानसभा मतदारसंघातील वंचित बहुजन आघाडीचे अधिकृत उमेदवार संतोष पवार यांचा पाकणी, शिवणी, हिरज, तिऱ्हे तांडा, बेलाटी, कवठे, अकोले, पाथरी, डोणगाव, तेलगाव, तिऱ्हे, देगाव या ठिकाणी प्रचारा निमित्त गावभेट दौरा संपन्न झाला. गावा-गावातून उत्स्फूर्त आणि भरघोस प्रतिसाद मिळत आहे. आजच्या दिवसाची प्रचाराची सांगता तिऱ्हे येथे जनसन्मान सभा घेऊन झाली.

पवार यांनी सिंचनाचे क्षेत्र, तालुक्यासाठी स्वतंत्र MIDC, मंद्रूप तालुका निर्मिती व सरकारची विभागीय कार्यालये नाहीत, अश्या विविध प्रलंबित प्रश्नांवर आजवर तालुक्याचे प्रतिनिधित्व केलेल्या लोकप्रतिनिधींवर ताशेरे ओढले. तालुक्यातील प्रस्थापित नेते आणि घराणेशाहीला डावलून मला मिळणारा जनतेचा प्रतिसाद म्हणजे फक्त उमेदवाराला नव्हे, तर न्याय, समानता आणि तालुक्याच्या सर्वांगीण विकासाच्या मार्गाला दिलेला जाहीर पाठिंबा आहे. एकजुटीच्या जोरावर, नवा आत्मविश्वास आणि समाजाच्या हक्कासाठी उभी राहणारी जनता या निवडणुकीत निश्चितच परिवर्तन घडवेल असा विश्वास व्यक्त पवार यांनी जनसन्मान सभेत व्यक्त केला.

याप्रसंगी वंचित बहुजन आघाडीचे माजी जिल्हाध्यक्ष - विजयकुमार गायकवाड, शहराध्यक्ष - प्रशांत गुनेवार, सोलापूर दक्षिण तालुका अध्यक्ष - सुरेश देशमुख, सह सचिव - शिवाजी मंजरेकर ,जिल्हासंघटक - उत्तम दिलपाक, सायरा शेख, आतिष बनसोडे, विक्रांत गायकवाड, असिफ यत्नाळ संतोष राठोड , अजय चव्हाण, अमोल कांबळे, किरण पवार, रोहित पवार, आणि स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते, आदी उपस्थित होते.

# भिवंडी ग्रामीण विधानसभा मतदारसंघाचे उमेदवार शांताराम मोरे यांना श्रमजीवी संघटनेचा पांठीबा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

भिवंडी/प्रतिनिधी :भिवंडी ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार व विद्यमान आमदार शांताराम मोरे यांना श्रमजीवी संघटनेने पाठिंबा जाहीर केला आहे.



भिवंडी ग्रामीणमधील आदीवासी गांवामध्ये आमदार शांताराम मोरे यांनी भरघोस निधी देऊन अनेक विकासकामे केली आहेत. अनेकजंणाना वैयक्तिक लाभाच्या योजना देऊन मदत केली आहे. त्यामुळे शांताराम मोरे यांच्या विकासकामांवर विश्वास ठेऊन श्रमजीवी संघटनेने त्यांना पांठीबा जाहीर केला आहे भिवंडी ग्रामीण विधानसभा मतदारसंघात श्रमजीवी संघटनेचे सदस्य असलेल्या मतदाराची संख्या लक्षणीय असुन त्यांची मते मोरे यांच्या विजयासाठी निर्णायक ठरु शकतात. नुकतीच श्रमजीवी संघटनेच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांनी उमेदवार शांताराम मोरे यांची भेट घेऊन त्यांना विजयासाठी शुभेछा दिल्या.

यावेळी शिवसेना उपनेते प्रकाश पाटील ठाणे जिल्हा मजुर फेडरेशनचे माजी अध्यक्ष व विद्यमान संचालक पंडीत पाटील उपजिल्हाप्रमुख विष्णू चंदे भिवंडी ग्रामीण विधानसभा संघटक मनोहर ठाकरे, श्रमजीवी संघटनेचे सरचिटणीस बाळाराम भोईर, जिल्हाध्यक्ष अशोक सापटे, प्रमोद पवार, तालुकाध्यक्ष सुनील लोणे उपस्थित होते.




**रिपब्लिकन कार्यकर्त्यांनी जागा वाटप मधील नाराजी दूर सारून महायुतीच्या अधिकृत उमेदवारांचा प्रचार करावा** — **ना. रामदास आठवले यांचे आवाहन**

# रिपब्लिकन कार्यकर्त्यांना राज्यात सत्तेचा वाटा मिळवून देण्यासाठीच महायुतीला रिपब्लिकन पक्षाचा पाठींबा : केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई/प्रतिनिधी : रिपब्लिकन पक्ष हा महायुती चा प्रमुख घटका पक्ष आहे त्यामुळे विधानसभा निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाचा महायुतीच्या अधिकृत उमेदवारांना पाठिंबा आहे. माहीम मतदारसंघात महायुतीचे अधिकृत उमेदवार सदा सरवणकर यांना आमचा पाठिंबा आहे. तसेच मानखुर्द- शिवाजीनगर मतदारसंघात महायुतीचे अधिकृत उमदवार सुरेश उर्फ बुलेट पाटील यांना रिपब्लिकन पक्षाचा पाठिंबा आहे अशी घोषणा आज रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांनी आज पत्रकार परिषदेत केली. गरवारे क्लब येथे आयोजित पत्रकार परिषदेत ना.रामदास आठवले बोलत होते.

रिपब्लिकन पक्षाच्या कार्यकर्त्यांना राज्यात सत्तेचा वाटा मिळवून देण्यासाठीच आपण रिपब्लीकन पक्षाचा महायुतीला पाठिंबा दिला आहे. मागील अडिज वर्षात रिपब्लिकन पक्षाला सत्तेचा वाटा मिळाला नाही मात्र आता महिन्या भारत निवडणूक कार्यक्रम संपेल आणि पुन्हा महायुती सरकार सत्तेवर येईल.त्यात रिपब्लिकन पक्षाला सत्तेचा वाटा निश्चित मिळेल.रिपब्लिकन पक्षाला विधान परिषद सदस्य ; चार महामंडळाची अध्यक्षपदे; आणि ६० महामंडळ सदस्य पदे; जिल्हा तालुका शासकीय समित्यांची सदस्यपदे रिपब्लिकन कार्यकर्त्यांना देण्यात येईल. आगामी काळात महापालिका निवडणुका; जिल्हा परिषद पंचायत समिती मध्ये रिपब्लिकन कार्यकर्त्यांनी आपले वॉर्ड बांधावेत. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये रिपब्लिकन कार्यकर्त्यांना निश्चित उमेदवारी मिळेल.स्थानिक स्वराज्य संस्थांमधील निवडणुकांतील उमेदवारी जिंकण्याची तयारी आतापासून रिपब्लिकन कार्यकर्त्यांनी करावी.त्यामुळे रिपब्लिकन कार्यकर्त्यांनी जागा वाटप मधील नाराजी दूर सारून महायुतीच्या अधिकृत उमेदवारांचा प्रचार करावा असे आवाहन ना.रामदास आठवले यांनी केले आहे.

**माहीम मतदारसंघात महायुतीचे अधिकृत उमेदवार सदा सरवणकर आणि मानखुर्द शिवाजी नगर मध्ये सुरेश उर्फ बुलेट पाटील यांना रिपब्लिकन पक्षाचा अधिकृत पाठींबा : केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांची घोषणा**

**मनोज जरांगे यांनी विधानसभा निवडणुकीतून आपल्या उमेदवारांची माघार घेतली हा त्यांचा राजकीय सामाजिक दृष्ट्या अत्यंत चांगला आणि दूरदृष्टी असणारा निर्णय आहे.त्यांचे या निर्णयाचे आपण स्वागत करतो केवळ एका समाजाच्या मतावर उमेदवार निवडून येऊ शकत नाहीत. त्यामुळे माघार घेण्याचा त्यांचा निर्णय हा महायुतीचा विजय सुकर करणारा निर्णय आहे असे सांगत ना.रामदास आठवले यांनी मनोज जरांगे यांच्या भूमिकेचे स्वागत केले आहे.**

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी एका जातीच्या मतांवर निवडणुका जिंकता येत नाहीत म्हणून शेड्युल्ड कास्ट फेडरेशन बरखास्त करून सर्व जाती जमाती धर्मियांना सोबत घेणाऱ्या रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया पक्षाची संकल्पना मांडली.त्यामुळे मराठा समाजाची संख्या जास्त असली तरी एका समाजाच्या बळावर निवडणुका जिंकता येत नाहीत असे ना.रामदास आठवले म्हणाले.

राज ठाकरे यांनी माझ्या मंत्री पदा बद्दल जे वक्तव्य केले ते त्यांना शोभणारे नाही. त्यांना मंत्री व्हायचे नसेल तर त्यांनी मंत्री होऊ नये. आम्हाला महमानव डॉ.बाबसाहेब आंबेडकरांनी सत्ता हाती घेण्याचा संदेश दिला आहे.मी तळागळातून आलेलो आहे.त्यामुळे सत्ता महत्त्वाची आहे.गरिबांना मदत करणे आणि सत्तेचा गरिबांसाठी उपयोग करणे याची मला जाणीव आहे असे सांगत ना. रामदास आठवले यांनी राज ठाकरे यांना त्यांचे मंत्री पदा बद्दल चे शोभणारे नसल्याचे म्हंटले आहे.

